

# आगळे वेगळे प्रदर्शन

**" ... चित्रामध्ये सतीची चाल हुंडा यावर अर्थपूर्ण चित्रे होती. हुंड्यावर टीका करणाऱ्या चित्रात एका बाजूला नोटांचा ढीग व दुसरीकडे नवी नवरी !**

**" विवाह की सौदा " असे त्या चित्राचे नाव ?"**

---

" काल मी एक वेगळच प्रदर्शन पाहिलं ! "

" असेल काही तरी मोडक्या तोडक्या वस्तूंपासून सजावटीच्या वस्तू करण्याचं नाहीतर निसर्ग चित्रांचं ! किंवा मग सेलला लावलेल्या साड्यांचं !"

" हे बघ प्रदर्शन होतं एका कामगार वस्तीत !"

" मग असेल सरकारी प्रदर्शन ! घर व वस्ती कशी स्वच्छ ठेवावी म्हणून !"

" प्रदर्शन सरकारी नव्हतं किंवा तू म्हणतेस त्याही प्रकारचं नव्हतं... प्रदर्शन मांडलं होतं स्त्रियांच्या एका संघटनेनं आणि ते प्रदर्शन होतं स्त्रियांचे प्रश्न मांडणारं ! त्यांच्यावरील अन्याय दाखविणारं !

" स्त्रियांचे प्रश्न म्हणतीएस... काय होतं काय एवढं त्या प्रदर्शनात ?"

"प्रदर्शनाच्या सुरवातीलाच एक चित्र होतं ! त्या चित्रात बाईच्या पायात बेड्या होत्या, हात साखळदंडानी बांधलेले होते ! त्या बाईच्या चेहऱ्यावर त्वेष होता, कसलीतरी चीड होती... म्हणून साखळदंड किंचित तुटल्यासारखा होता. आणि याला नावही आकर्षक होतं गुलामीच्या बेड्या तोड तोड ...!

" बायका काय गुलाम आहेत ? "

" ...अग प्रदर्शनातच पुढे अनेक चित्रामध्ये उदाहरणे देऊन, स्त्रियांना वेगवेगळ्या चालीरीती, व्रत वैकल्य, इत्यादींचं बंधन घालून घरात कसं अडकवून ठेवलं येथपासून आज दलित शेतमजूर स्त्रीला अत्याचार सहन कसे करावे लागतात इथपर्यंत सर्व दिलं होतं ! याला गुलामी नाही म्हणायचं तर मग काय म्हणायचं ?"

" ते खरं ग ! पण प्रदर्शनात होतं काय काय ? जरा आणखी सांग !"

## सरंजामी कालातील स्त्रिया

" आपल्या कालखंडाला औद्योगिक युग असे नाव दिले तर या आधी संरजामदारी होती ! आजच्या काळापेक्षा धर्माचे वर्चस्वही तेव्हा मोठे होते. या काळात स्त्रीला शिक्षण दिलं जात नव्हतच. संपत्तीवर तिचा हक्का नव्हता. शिवाय अमानुष चालीरीती होत्याच ! चित्रामध्ये सतीची चाल, हुंडा यावर अर्थपूर्ण चित्रे होती. हुंड्यावर टीका करणाऱ्या चित्रात एक तराजू काढला होता आणि तराजूमध्ये एका बाजूला नोटांचा ढीग आणि दुसऱ्या बाजूला नवी नवरी होती. या चित्राला नाव होतं हा विवाह की सौदा ? विवाह म्हणजे दोन जीवाचे मीलन. ते राहिलं दूरच, पण मुली पेक्षा तिच्या आईवडीलाकडून मिळणाऱ्या हुंड्याला, पैशाअडक्यालाच महत्त्व ! मुलींची लग्न फार लहान-

पणी केली जात. आणि काही जातीत नवरा मेल्यावर केशवपन करीत नाही तर सवतीने सतीही जायला लावत ! स्त्रीनें सीता सावित्रीसारखं पतिनिष्ठ आणि सेवामग्न असलं पाहिजे हाच आदर्श होता, तिला एक व्यक्ती म्हणून स्थानच नव्हतं"

"होना! बायकांना चार भिंतीच्या आडच मरावे लागे नाही !"

"तर या सगळ्या विषयावर मोठी, अर्थपूर्ण चित्रे देऊन या काळातल्या स्त्रियांची स्थिती मांडली होती. शिवाय स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नये असे धर्मग्रंथ सांगत. मनुस्मृतीतले काही उतारेही लिहिले होते. ते स्पष्ट करणारी चित्र होती. स्वयंसेविका ते समजावूनही देत होती !"

"पण आज कितीतरी बायका घराबाहेर पडल्यात. काय प्रश्न आहेत त्या बायकांचे ?"

## चालू कालातील स्त्रीचे प्रश्न

"आधी मलाही तुझ्यासारखीच शंका होती. आज बायका घराबाहेर पडल्या आहेत म्हणून त्यांना प्रश्नच नाही असं नाही. उलट आज कुटुंब, समाज व कामाच्या ठिकाणी तिला अनेक प्रश्न असतात. असं बघ, बाईला नोकरीही करावी लागते आणि घरकामही. म्हणजे तिच्यावर कामाचा दुप्पट बोजा ! तिला कामाच्या दोन पाळ्या ! काम तरी काय प्रकारचं मिळतं बायकांना ? शहरातल्या बहुतेक अशिक्षित स्त्रिया मोलकरणी, सफाई कामगार, विडी कामगार, बिगारी कामगार आणि सुशिक्षित स्त्रिया शिक्षिका, नर्स नाहीतर कारकून. कुशल कामगार, तंत्रज्ञ, अधिकारी बायका किती कमी आहेत. स्त्रियांना तांत्रिक शिक्षणाची संधी मिळतच नाही. आपल्याला ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न माहीत नसतात. त्या प्रदर्शनात त्या स्त्रियांचे प्रश्न इतके व्यवस्थित मांडले होते ! तुला माहीती आहे त्या स्त्रिया निरक्षर असतात. कुठेतरी शेतमळ्यावर त्या रोजावर कामाला जातात. त्यांचं पोट हातावर असतं पण हे कामही बारा महिने मिळत नाही. बाळंतपणाची रजा नाही की आजारपणाची ! पुरुषाइतके काम करूनही स्त्री म्हणून रोज कमी दिला जातो."

"पण समान वेतनाचा कायदा आला आहे ना"

"कायदा खूप असेल ! जिथे कायद्याची अंमलबजावणी करायची तिथे बायकांना कामावरून काढून टाकतात. प्रदर्शनात १९७१ च्या जनगणनेतील आकडेवारी नकाशे, चार्टच्या सहाय्याने समजावून दिली होती. बालमृत्यू, स्त्रीमृत्यू, साक्षरता, वेगवेगळ्या व्यवसायातील स्त्रियांचे प्रमाण दिले होते. ही आकडेवारी पाहिलीस तर आपण स्त्रियांनी अजून खूपच मिळवायचे आहे हे लक्षात येईल !

'आणखी कोणते प्रश्न दाखवले होते प्रदर्शनात ?'

"आजकाल स्त्रीला वस्तूच करून टाकलय, सिनेमा, जहिराती यामध्ये स्त्रीचा वापर केला जातो यावरची चित्रं होती."

"खरच अगदी. मी तर अलीकडे हिंदी सिनेमाला जात नाही. नुसता बाजार मांडतात नटचांचा."

"शिवाय अजूनही धर्माच्या नावाखाली देवदासी मुरळ्या वगैरे प्रकार चाललेच आहेत ! मुसलमान स्त्रियांचाही तलाकाचा प्रश्न प्रदर्शनात होता. शिक्षण नाही, काम नाही म्हणून हजारो स्त्रिया शहरात जाऊन वेश्या होतात हे ही दाखवलं होतं ! त्याबरोबर दारूबाजी, मटका, जुगार या व्यसनांमुळे स्त्रीची कशी नाडणूक होते यावर बोलकी चित्र होती. हे प्रश्न आजच्या समाजात का निर्माण होतात याचीही थोडक्यात माहिती दिली होती."

"पण प्रदर्शनात फक्त अन्याय, अत्याचार, स्त्रीची गुलामी, तिचं समाजातलं स्थान सांगणारीच पोस्टर्स होती ? स्त्रियांची प्रगती व्हावी म्हणून महर्षि कर्वे, आगरकर यांनी समाजनिंदा, हेटाळणी सहन केली. त्याबद्दल चित्र नव्हती ?"

"अग पूर्ण ऐकून तर घे ! ज्यांनी ज्यांनी स्त्री शिक्षणासाठी, समाजसुधारणेच्या चळवळीचा भाग म्हणून कार्य केले त्या सर्वांवर चित्रे होती. महात्मा फुल्यांनी अस्पृश्योन्नतीच्या कार्याबरोबरच स्त्री शिक्षण,

अनाथाश्रमाला सुरुवात केली होती त्यावर चित्र होतेच ! सावित्रीबाई फुल्यांना लोक मुलींच्या शाळेकडे जाताना दगड मारत आहेत असे सांगणारे चित्र होते. पंडिता रमाबाईचे स्त्री शिक्षणाचे कार्यही चित्ररूपाने मांडलं होते ...

'आणि स्वातंत्र्य लढ्यातली स्त्रियांची भागीदारी? प्रभात फेऱ्या, मिरवणुका, भूमिगत कामात स्त्रिया सहभागी होत त्याविषयी......"

"प्रदर्शनात भारतातील स्वातंत्र्य लढ्यातला स्त्रियांचा सहभाग चित्रांच्या साहाय्यान दाखवला होता. ब्रिटिशांच्या विरोधी आंदोलनात बायकांनी लाठ्या खाल्ल्या हे पाहून प्रदर्शन पहाणाऱ्या बायकांना अभिमान वाटत होता."

"पण या प्रदर्शनात भारतातल्या स्त्रियांची फक्त १९४७ सालापर्यंतचीच माहिती होती ?"

"असं कसं ? तुला मला माहित नसलेल्या खूप लढ्यांची माहिती त्या प्रदर्शनाद्वारा करून दिली होती. लढे अगदी अलीकडचे, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे !"

"पण स्वातंत्र्य मिळाल्यावर कसले प्रश्न ग ? आपलं सरकार आल्यावर ?"

"बाईसाहेब जरा डोळे उघडून आजूबाजूला बघा! १९७४ साली तुमचीच मावशी महागाईविरोधी आंदोलनात सहभागी होती न ? महागाई, भाववाढ, टंचाई हे प्रश्न गृहिणी म्हणून स्त्रियांना भेडसावतात म्हणून १९७४ साली केवढा प्रतिकार केला बायकानी ! प्रदर्शनात याचे फोटो होते. महिला सचिवालयात घुसल्या, मुंबई बंद कशी केली. आपण हा सगळा इतिहास विसरतो... आपले प्रश्न कुठे संपलेत ! आज भारतातल्या असंख्य ग्रामीण स्त्रिया समान वेतन, किमान वेतनासाठी लढा देत आहेत. आदिवासी शेत-मजूर स्त्रिया वेठबिगारी विरोधी लढल्या. स्वत:चा संसार उध्वस्त करणाऱ्या दारुच्या व्यसनाचा संघटित प्रति-कार त्यांनी केला. आदिवासी दलित स्त्रीच्या या झुंजार टक्करीच्या चित्रापुढे बायका थांबत होत्या."

"स्त्रिया लढ्यात भाग घेतात हे खरं. पण गरिबी, बेकारी, अन्याय यांनी त्या इतक्या गांजलेल्या आहेत. की त्यातून बाहेर पडता येईल असं काही वाटत नाही."

"तुझ्या सारखाच अनेक जणांची गैरसमजूत आहे. मला सुद्धा माहीत नव्हतं की कित्येक ठिकाणी बायका आपल्या हक्कासाठी कशा झगडल्यात... रक्त सांडलय! भारताबाहेरची तर आपल्याला काहीच माहिती नसते. युरोपात, अमेरिकेत पूर्वी बायकांना मत देण्याचा हक्क नव्हता. तो हक्क बायकांनीच मताधिकाराची चळवळ करून, तुरूंगात जाऊन, संसदेत घुसून, मोर्चे काढून, लाठीहल्ला सहन करून मिळवला. माहिती आहे ?

"नाही. तुला तरी काय माहिती ?"

"प्रदर्शनात पाश्चात्य राष्ट्रात स्त्रियांनी मताच्या अधिकारासाठी कसा लढा दिला याची माहिती होती. खरच आपल्याला मताच्या हक्कासाठी झगडावं लागलं नाही पण नागरिक म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांना रस्त्यावर यावं लागलं... याचं नेतृत्व स्त्रियांनी केलं होतं... या गोष्टी चित्ररूपाने सांगितलेल्या होत्या. बायका रस्त्यावर येऊ शकतात, गरीब गाय म्हणून त्या दावणीला जास्त काळ थांबू शकत नाहीत. बायका लढू शकतात...... केवढी नवी माहिती, नवी जाणीव होत होती त्या चित्रांमधून !"

"बायका मोर्चात येऊ शकतील ग पण दोन हात करू शकणार नाहीत. बायका आणि लढणार ?"

"ऐक. त्या प्रदर्शनात बंदूक घेऊन लढलेल्या बाय-कांची चित्रं होती ! जगात आज असे बरेच देश आहेत ज्या देशात बायका समान स्थान मिळविण्याच्या मार्गा-वर आहेत. त्या बायकांना नवस उपासतापास करून हे स्थान मिळाले नाही. त्यासाठी त्यांना लढावे लागले. व्हिएतनाम मधलंच बघ ! अमेरिकेसारख्या हातात जगातला पैसा एकवटलेला, हवीतेवढी शस्त्रं, अणुबॉम्ब सारखी विघातक संपत्ती असलेल्या देशाशी एवढासा देश ३० वर्ष लढला, विजय मिळवला... इथे बायका सुद्धा सैन्यात होत्या. रशिया, चीन, क्युबा अशा समाज-वादी देशात आज सर्व बायका सुशिक्षित आहेत. या बायका ट्रक, ट्रॅक्टर, विमान अशी अवजड वहाने चाल-वतात. रशियाच्या अंतराळ संशोधनामध्ये ५५% स्त्री संशोधक आहेत. प्रदर्शनात ट्रॅक्टर चालविणारी बाई, बंदुका घेऊन लढणाऱ्या स्त्रियांची चित्रं पाहून असं स्फुरण चढत होतं..."

"त्यांच सरकार असेल चांगलं !"

"अग त्या राष्ट्रामध्ये जनतेची सत्ता येण्यासाठी त्या बायकांना क्रांतीकारी लढ्यातही सहभागी व्हावे लागले... म्हणून सर्वसामान्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या गरजा भागू लागल्या स्त्रियांना विकासाची संधी मिळू लागली. तसेच ह्या समाजवादी राष्ट्रातील स्त्रियांना शिक्षण घेता यावे आणि नोकरी करता यावी म्हणून अनेक सुखसोयी केलेल्या दिसतात.

"समाजवादी राष्ट्र म्हणजे ?"

"समाजवादी राष्ट्रात सर्व साधन संपत्ती समाजाच्या मालकीची असते. कारखाने, शेते, मळे खाजगी मालकीची नसतात. त्या सर्वांचा उपयोग जनतेच्या गरजा लक्षात घेऊन केला जातो. म्हणून तर स्त्रियांसाठी निरनिराळ्या सोयी करणे शक्य झालं आहे तेथे. पाळणाघर प्रत्येक ठिकाणी ! शिवाय स्वस्त भोजनगृह, धुलाई केंद्र. तसेच प्रत्येक स्त्री-पुरुषाला काम मिळतं. बेकारी नाही, उपासमार नाही, झोपडपट्ट्या नाहीत, वेश्याव्यवसाय नाही ! या गोष्टी आपल्याला कधीच माहित नव्हत्या. स्त्रियांना काम, राहाती जागा आणि एवढ्या सुखसोयी मिळू शकतात याच कामगार वस्त्यातील बायकांना खूपच आश्चर्य वाटत होतं. त्याचबरोबर त्या बायका परकीय वर्चस्वाविरूद्ध आणि अन्याय करणाऱ्या सरंजामदार भांडवलदार यांच्या विरूद्ध कशा प्रकारे लढल्या आणि समाजवादी समाज उभा करण्यासाठी कशा झटत आहेत या बद्दलची माहिती अगदी नवीन वाटली."

"आपल्या सारख्याच बायकांची लढायची, अन्यायाला प्रतिकार करण्याची वृत्ती पाहून प्रदर्शन पहाणाऱ्या स्त्रीला नवीन आत्मविश्वास येत असेल नाही ? "

"होना... कारण एक आपल्याला माहित नसलेले अन्यायाच्या प्रतिकारात्मक जग, नवे दालन त्यांच्या समोर ठेवले गेले होते ! जगाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात बायका लढत होत्या, लढत आहेत. आपल्या आजूबाजूलाही अन्यायाला तोंड देणे चालू आहे ही माहिती फार प्रेरणादायी होती !

"प्रदर्शनाचा शेवट काय होता ?"

"स्त्रियांवरचा जुलूम तिचे विविध सामाजिक प्रश्न, तिच्या हक्कांच्या चळवळी चित्ररुपाने मांडल्या नंतर आज भारतीय स्त्रीच्या मागण्या काय आहेत तिला कशाकशाची गरज आहे हे मांडलं होतं. आणि हे सर्व मांडल्यावर शेवटी स्त्रिया एक झाल्या आहेत, त्यांनी हात उंचावले आहेत आणि त्या एकजुटीने पुढे चालल्या आहेत असे चित्र होते...," "स्त्री स्वतःच लढून स्वतःला मुक्त करून घेईल" हे वाक्य मोठ्या अक्षरात लिहिले होते !

"खरच आपणही आपल्या मंडळातर्फे करायचे का असे प्रदर्शन !"

"होय ! मलाही अगदी मनापासून वाटायला लागलय... चित्रातून कितीतरी गोष्टी सोप्या पद्धतीने समजावून देता येतात. या प्रदर्शनात निरनिराळ्या मासिकातून येणाऱ्या चित्रांचा मोठ्या कौशल्याने वापर केला होता, शिवाय काही व्यंगचित्रे, नकाशे, आलेख, सारेच मोठे बोलके होते. अगदी निरक्षर स्त्रीला सुद्धा चित्रामुळे निरनिराळे प्रश्न जाऊन भिडत होते ! खरोखरच आता आपणही प्रदर्शन बनविण्याच्या तयारीला लागूया. जुनी देशी, परदेशची सचित्र मासिकं, कॅलेंडरं वगैरेवरून चित्र गोळा करू. शिवाय समाजजीवन कोणत्या अवस्थातून गेले, त्याबरोबर स्त्रीच्या स्थानात व जीवनात कसे बदल झाले, त्यासाठी स्त्रियांनी कोठे नि कसे झगडे दिले याची समग्र माहिती पत्र गोळा करू या. मग आपल्यालाही असे प्रदर्शन करता येईल."

— लता भिसे

### स्त्री व पुरुष यांच्यातील मृत्यूचे प्रमाण*
### (१९६९)

| वय गट | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| ०–४ | ५८.३ | ७०.२ |
| ५–९ | ५.८ | ७.४ |
| १०–१४ | ३.० | २.७ |
| ५–१४ | ४.५ | ५.३ |
| १५–४९ | ५.३ | ६.१ |
| एकूण | १८.२ | २०.१ |

* दर १००० व्यक्तींमागे मरण पावणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण